# महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०२२-२०२३
## लातूर जिल्हा

जाहिरात क्रमांक ०१/२०२४ | ठिकाण :- लातूर | दिनांक ०१.०३.२०२४

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक २३.०६.२०२२ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणा नुसार **पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर** यांच्या आस्थापनेवर सन २०२२-२०२३ मध्ये **पोलीस शिपाई** संवर्गात रिक्त होणारी (४४) पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

**१) पोलीस शिपाई**

| | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | इडब्ल्यूएस | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | ०५ | -- | -- | -- | ०३ | -- | -- | -- | ०४ | ३२ | -- | ४४ |
| कप्पीकृत आरक्षण ↓ | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०२ | -- | -- | -- | ०२ | -- | -- | -- | ०२ | ०७ | -- | १३ |
| महिला | ०२ | -- | -- | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ | १० | -- | १४ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | -- | ०२ |
| प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | -- | ०२ |
| भुकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ |
| माजी सैनिक | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०५ | -- | ०७ |
| अंशकालीन पदवीधर | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | -- | ०२ |
| पोलीस पाल्य | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ |
| गृहरक्षक दल | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | -- | ०२ |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | |

**टिप:- वरील नमुद अनुसूचीत जाती प्रवर्गातील (०५) पदे ही पोलीस शिपाई (बॅण्डस्मॅन) ची आहेत.**

**महत्वाची टीप :-**

पोलीस शिपाई / बॅण्डस्मॅन पदाच्या भरती करिता कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती ॲन्टीकरप्शन ब्युरो, **पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर** यांना **दुरध्वनी क्रमांक ०२३८२-२४२६७४** वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस शिपाई भरती समिती-२०२२-२०२३ तथा पोलीस अधीक्षक यांच्याशी संपर्क साधुन तक्रार करू शकतील.

**उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | पोलीस अधीक्षक कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) सकाळी ०९.४५ ते सायंकाळी १८.१५ वाजता पावेतो. | दुरध्वनी क्रमांक :- ०२३८२-२४२२९६ |

(सौमय मुंडे)
पोलीस अधीक्षक, लातूर

Scanned with OKEN Scanner

# लातूर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२२-23

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि दिनांक २३.०६.२०२२ च्या सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तरतुदीनुसार **पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर** यांचे आस्थापनेवरील **पोलीस शिपाई** यांची (४४) रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदन पत्र संगणकीय प्रणालीद्वारे दिनांक ०५.०३.२०२४ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत स्विकारण्यात येतील. ह्या बाबतची सविस्तर माहिती **policerecruitment2024.mahait.org** आणि **www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पद्धतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा **policerecruitment2024.mahait.org** या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरीता संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करू शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्यावर रद्द होईल.
- पोलीस शिपाई या पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारीरीक चाचणी परीक्षा घेण्यात येईल व त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही सर्व पोलीस घटकामध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाबत विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.
- भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारिरीक चाचणी घेण्यात येणार आहे. शारिरिक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवारांमधुन संबंधीत प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवाराची १०० गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.
- सर्व पोलीस घटकामध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा.
- शारिरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमुद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधुन एक गुणवत्ता यादी तयार केली जाईल. तापुरत्या निवडसुचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवड सुचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसुचीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional Selection) असेल. शारिरिक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रीकरण केल्यानंतर गृह विभाग शासन निर्णय दिनांक १०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरिक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सुचना **policerecruitment2024.mahait.org** या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. सदरहु जाहिरात उमेदवाराने काळजीपुर्वक वाचुन, समजुन घ्यावी. तसेच सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथाकरीता उपलब्ध पदाच्या १ टक्के आरक्षीत जागा विचारात घेऊन रिक्त पदाबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारानी ऑनलाईन पद्धतीने आवेदन अर्ज सादर करावेत.
- भरती प्रक्रिये दरम्यान शारिरिक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास त्यास भरती प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही.
- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करू शकतात, परंतु खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करून शकरणार नाहीत.
- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरूद्ध मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

(सोमय मुंडे)
पोलीस अधीक्षक, लातूर

Scanned with OKEN Scanner